**नि.दि.दा.क्र.२०६/२०१९**
**नि.क्र.९०**

**वादी करीता सा.क्र.१**

**प्रतिवादी क्र.१,२,४ व ६ यांना पुकारले असता गैरहजर. प्रतिवादी क्र.१,२ व ४ यांचे विधीज्ञही पुकारले असता गैरहजर. प्रतिवादी क्र.१,२,४ व ६ यांची कैफियतही नाही. त्यांच्या वतीने अर्जही नाही. परिणामी प्रस्तूत प्रकरण त्यांच्या उलट तपासाविना पुढे चालविण्यात आले.**

**<u>प्रतिवादी क्र.३ व ५ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.यु.एस.जाधव यांच्या वतीने शपथेवर सुरू</u>**

४. माझ्या वडिलांचे नाव किसन व चुलत्याचे नाव तातेराव आहे. तातेराव व किसन यांच्यामध्ये मिळकतींचे वाटप झाले होते हे म्हणणे खरे आहे. तातेराव व किसन यांच्यामध्ये झालेल्या वाटप पत्राचा दस्त मी दाखल करू शकतो. तातेराव व किसन यांना तीन बहिणी नामे विठाबाई व सोनाबाई अशी आहेत. तिस-या बहिणीचे नाव मला माहित नाही. सोनाबाई हया सद्या हयात नाहीत. माझे आजोबा राघोबा केव्हा मयत झाले हे मला आठवत नाही. माझे आजोबा राघोबा यांच्या पत्नी भागाबाई या केव्हा मयत झाल्या हे मला माहित नाही. दिगंबर व मोहन हे माझे चुलते आहेत. माझे वडिल किसन यांना ईतर तीन भाऊ नामे तातेराव, मोहन व दिगबंर अशी आहेत हे म्हणणे खरे आहे.

**प्रश्न**- माझे वडिल किसन, त्यांचे भाऊ नामे तातेराव, मोहन व दिगबंर यांच्या सर्वांच्या मध्ये झालेला तो वाटपपत्राचा कागद आहे काय ?

**उत्तर**- केवळ माझे वडिल किसन ईतर भावांपासून विभक्त् झाले होते, तो कागद माझ्याकडे आहे.

५. तो कागद सन-१९८३ किंवा १९८५ चा आहे. सन-१९८८ ला माझे वडिल किसन व त्यांचे भाऊ तातेराव हे विभक्त झाले असे काहीही घडले नाही. सन-१९८८ ला माझे वडिल किसन व त्यांचे भाऊ तातेराव हे विभक्त झाले हे दाव्यातील कथन चुकीचे आहे, साक्षीदार स्वत: सांगतात की, सन-१९८९ ला तसा फेरफार

झाला होता. माझे वडिल किसन हे त्यांचे भाऊ तातेराव यांच्या पासून विभक्त झाल्याबाबतचा कागद मी दाखल केला नाही. माझे वडिल किसन हे त्यांचे भाऊ तातेराव यांच्या पासून विभक्त् झालेबाबतचा दस्त साध्या पांढ-या कागदावर लिहीलेला आहे. तो दस्त कोणी लिहीला व त्यावर कोणाच्या सहया आहेत हे मला माहित नाही. त्या दस्तावर माझ्या आत्यांच्या सहया आहेत किंवा नाही हे ही मला माहित नाही. त्या दस्ताआधारे फेरफार झाला किंवा नाही हे ही मला माहित नाही. सन-१९८९ झालेला फेरफार कोणत्या दस्ताआधारे झाला हे देखील मला माहित नाही. माझे वडिल किसन यांच्या नावे असलेली जमीन कोणत्या दस्ताआधारे आलेली आहे तेही मला माहित नाही.

**प्रश्न**- ज्या दस्ताआधारे माझ्या वडिलांच्या नावे शेती झाली तो दस्त तुम्ही दाखल करू शकता का ?

**उत्तर**- मला माहित नाही.

६. माझ्या वडिलांच्या हिस्यास शेळगी गावातील घर क्र.१२५ मधील अर्धा हिस्सा वाटपास आलेला आहे. माझे वडिल सद्या तेथे राहत नाहीत. माझ्या वडिलांच्या वाटपास आलेली घर जागा सद्या रिकामी असून माझे वडिल दुस-या घरात राहतात. ते घर आम्ही सर्वांनी घेतले आहे. ते घर ४६ x ४६ फुट आहे. माझ्या वडिलास वाटपामध्ये घर क्र.१२५ मधील अर्धा हिस्सा मिळाला हे तातेराव पासून माझे वडिल विभक्त झाल्याबाबतच्या दस्तात लिहीले आहे किंवा कसे हे मला माहित नाही.

७. सर्वे क्र.५५/१/ब मधील ३ एकर २० गुंठे जमीन पाझर तलावासाठी संपादित झाली होती किंवा कसे हे मला माहित नाही, साक्षीदार स्वत: सांगतात की, माझ्या वडिलाची तर संपादित झाली नाही. सर्वे क्र.५५/१/ब मधील १ हे. ६५ आर क्षेत्र माझे वडिल किसन यांना वाटपात मिळाले होते. सर्वे क्र.५५/१/ब मधील १ हे. ६५ आर क्षेत्र माझे वडिल किसन यांना वाटपात मिळाली हे दाखविणारा दस्त मी दाखल करू शकत नाही. माझ्या वडिलास सर्वे क्र.५५/१/ब मधील १ हे. ६५ आर क्षेत्र वाटपात आले होते हे मी ७/१२ पत्रक व फेरफार आधारे सांगत आहे. सर्वे क्र.५५/१/ब मधील १ हे. ६५ आर क्षेत्राच्या दाव्यात दर्शविलेल्या चतु:सिमा त्याच

आहेत हे दर्शविणारा महसूली किंवा ईतर दस्त माझ्याकडे नाही. प्रस्तूत दावा मी किसन, सुमनबाई व निर्मलाबाई यांच्या संगनमताने दाखल केला हे म्हणणे खरे नाही.

**प्रतिवादी क्र.३ व ५ यांचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरून उलट तपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.06.25 17:47:27 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक २५/०६/२०२५.